REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 8 | MAY - 2023

# विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेतील सहभागाच्या सद्यःस्थितीचा अभ्यास

सुखदेव विष्णू भालेकर
एम.ए. (इंग्रजी, इतिहास, शिक्षणशास्त्र), डी.एड्., बी.एड्., डी.एस.एम.
सहशिक्षक, जि.प.प्रा.शा. चव्हाणवाडी ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद

## प्रस्ताविक :-



सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे वाढती लोकसंख्या व त्यादृष्टीने होणाऱ्या संधीचा विचार करता पावलो पावली विद्यार्थ्यांना स्पर्धेला सामोरे जावे लागते. स्पर्धा सर्व क्षेत्राबरोबर शिक्षण क्षेत्रात असल्याचे जाणवते. शालेय स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धेची ओळख होत असते. वर्गातील सर्वच विद्यार्थी हे सारखे नसतात. त्यांच्या आवडी-निवडी बरोबर त्यांची बुध्दीमत्ताही वेगवेगळी असते.

शालेय स्तरावर अध्यापन करत असताना आपल्याला असे जाणवते की विद्यार्थी हे अभ्यासात इतके कुशाग्र असते की त्यांनी कठीणातील कठीण पाठयघटक सहज व सुलभतेने समाजाते. अशा कुशाग्र विद्यार्थाना शिक्षकांकडून योग्य ते मार्गदर्शन मिळाले तर त्यांची प्रगती लवकर होऊ शकते. अशा विद्यार्थ्यांच्या बौध्दीकतेचाविकास व मुल्यमापन करण्यासाठी राज्यशासनामार्फत विविध स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. इयत्ता 5 वी साठी पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय प्रवेशपात्र, महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा अशा विविध स्पर्धा परिक्षेतून कुशाग्र बुध्दीमतेच्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या बुध्दीला चालना देण्याचे कार्ये केले जाते.

ग्रामीण तसेचे शहरी भागातील विद्यार्थ्याचा शोध घेऊन गुणवत्तेच्या निकषांवर त्यांना रोख रक्कम शिष्यवृत्तीच्या स्वरूपात दिली जाते. या परिक्षेचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होण्यासाठी या परिक्षेत विद्यार्थ्यांचा सहभाग सुध्दा तेवढयाच प्रमाणात वाढणे महत्त्वाचे आहे.त्यासाठी स्पर्धा परिक्षेत सहभागी विद्यार्थ्यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास या विषयावर संशोधन करणे आवश्यक आहे.

## संशोधनाची गरज :-

शाळेतील हुशार, प्रतिभावंत विद्याभावंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे तसेच जे हुशार पण आर्थिक बाबतीत मागासलेले असतात. त्यांना स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून शिष्यवृत्ती उपलब्ध करून देणे इतकेच नव्हे तर इयत्ता 5 वी व 8वी शिष्यवृत्ती परिक्षेत विशेष गुण घेऊन पास होणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यंतचे मोफत शिक्षणासाठी शासकीय विद्यानिकेतनासाठी प्रवेश मिळवून देणे, इयत्ता 12 वी पर्यंतचे शिक्षण मोफत उपलब्ध करून देणे इत्यादी संधी मिळवून देणे हे प्राथमिक स्तरावरील स्पर्धा परिक्षच्या माध्यमातून घडणारे कार्ये आहे. त्यामुळे प्रतिभावंत विद्यार्थ्यांच्या बुध्दीच्या विकासाठी स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून घडणारे कार्ये आहे. त्यामुळे प्रतिभावंत विद्यार्थ्यांच्या बुध्दीच्या विकासाठी स्पर्धा परीक्षा आवश्यक आहे. स्पर्धा परिक्षा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवते. प्राथमिक स्तरावर होणाऱ्या स्पर्धा परिक्षांचे स्वरुप हे विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौध्दिक विकासास पोषण करणारे असते. स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भाषा, गणित, तर्कशक्ती, सामान्यज्ञान व आकलन पातळी वाढल्याचे दिसून येते.

स्पर्धा परिक्षेचे महत्त्व अनन्यसाधारण असले तरी अजूनही प्राथमिक स्तरावरील स्पर्धा परिक्षाबाबतची मानसिकता न बदल्याने विद्यार्थ्यांचा स्पर्धा परिक्षाबाबतची मानसिकता न बदल्याने विद्यार्थ्यांचा स्पर्धा परिक्षेतील सहभाग म्हणावा तेवढा याविषयीची पुरेशी माहिती नसते. त्याच प्रमाणे स्पर्धा परीक्षा बात पालकांमध्ये उदासिनता असल्याचे दिसून येते. तसेच स्पर्धा परिक्षच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांचा विकास होतो. यांची जाणीवही त्यांना नसते. परिणामी पालकांकडुन स्पर्धा परिक्षाबाबत मुलांना मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळत नाही.

यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. यासार्व साध्यतेसाठी स्पार्धा परिक्षेतील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून त्यांना त्यात येणाऱ्या समस्यांचा शोध घेवून उपाय केले तर स्पर्धा परिक्षेचा फायदा निश्चित जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होईल.

**समस्या विधान :-**

"तुळजापूर तालुक्यातील प्राथमिक स्तरावरील इयत्ता 5 वीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती स्पर्धा परिक्षेतील सहभागाच्या सद्यःस्थितीचा अभ्यास"

**गृहितके :**

1. प्राथमिक स्तरावर शिष्यवृत्ती स्पर्धा परिक्षेमध्ये विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाचा अभाव असतो.
2. स्पर्धा परिक्षेसंदर्भात पालकांमध्ये अनभिज्ञता असते.
3. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी पुरक साहित्याचा अभाव असतो.

**उदिष्टे :-**

1. शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेतील सहभागी विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
2. शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत सहभाग नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कारणांचा शोध घेणे.
3. शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत सहभाग सहभाग व नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कारणांचा शोध घेणे.
4. शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या पालकांची भूमिका अभ्यासणे.
5. शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांची भूमिका अभ्यासणे.

**परिकल्पना :-**

1) शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाची अपेक्षा असते.
2) शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेबाबत पालकांमध्ये उदासिनता असते.
3) स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक पुरक साधन, साहित्याचा अभाव असतो.

**संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही :-**

दैनंदिन अध्यापन करत असताना शिक्षण क्षेत्रात होत जाणाऱ्या नवनवीन बदलापैकी परीक्षा पध्दतीतील बदल, प्राथकि स्तरावर स्पर्धा परीक्षाची अंमलबजावणी होताना प्राथमिक स्तरांवरील शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थी सहभागात कमालीची उदासिनता दिसून आली.

संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही करताना गतकाळातील स्पधा्र परीक्षेविषयक गतसंशोधने व संबंधित साहित्य यांचा संशोधकांनी मांडलेल्या उद्दिष्टे, कार्यपध्दती, निष्कर्ष या अनुषंगाने आढावा घेण्यात आला. त्याचा उपयोग संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही करताना झाला. संशोधनाच्या कार्यवाहीत माहिती गोळा करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध संशोधन पध्दती पैकी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यातआला तसेच संशोधनाच्या साधनांपकी प्रश्नावलीच्या बंदिस्त व मुक्त प्रकाराचा वापर करत असताना संशोधन साधनाची निर्मिती करण्यात आली.

**संशोधनाची प्रमुख निष्कर्ष :-**

विद्यार्थी शालेय स्तरावर आयोजित विविध स्पर्धा परीक्षेत सहभागी होतात. शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेतील गणित व बुध्दीमत्ता या विषयाची विद्यार्थ्यांना भीती वाटते. शिक्षक स्पर्धा परीक्षेच्या मार्गदर्शनासाठी वेगळी तासिका, सराव चाचणीचे आयोजन करतात. शालेय ग्रंथालयात स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठीची पुरक पुस्तके पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. पालकांकडून आवश्यक त्या साहित्याचा तसेच मार्गदर्शनाचा अभावदिसून येतो. शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांना अनेक समस्या येतात. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक, भावनिक सामाजिक अशा सर्वांगीण विकासासाठी शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षाक पोषक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


1) डॉ. कामत वसुध, प्रतिभाशाली बालके मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन.
2) डॉ. शेटकार गणेश, डॉ. जोशी शोभना शैक्षणिक व मानसिक मापन औरंगाबा मृण्मयी प्रकाशन.
3) दीपक मगर, संस्कारदीप श्रध्दा प्रकाशन सातारा.
4) देशपांडे लीना, सर्वेक्षण एक संशोधन पध्दती (पुष्प चौथे) यशवंतराव चव्हाण मुकत विद्यापीठ नाशिक
5) देशपांडे लीना, प्रश्नावली उपयोजन (पुष्प सातवे) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक.



सुखदेव विष्णू भालेकर
एम.ए. (इंग्रजी, इतिहास, शिक्षणशास्त्र), डी.एड्., बी.एड्., डी.एस.एम.
सहशिक्षक, जि.प.प्रा.शा. चव्हाणवाडी ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद.